# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २१७ | सोमवार, २ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक करणाऱ्या आरोपींना अटक

**पुणे, ता. १ :** डिजिटल रेस्टची भीती दाखवून शहरातील एका ज्येष्ठ नागरिकाची पावणे अकरा कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या सायबर चोरट्यांना सायबर गुन्हे शाखेने अटक केली. हर्षद सुभाष धनतोले (वय-२३), समर्थ सुरेश देशमुख (वय २४, दोघे सध्या रा. कर्वेनगर, मूळ रा. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. आरोपी धनतोले, देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागातील (सीबीआय) अधिकारी असल्याची बतावणी केली होती. काळ्या पैशांच्या व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, या प्रकरणात सीबीआयकडून अटक (डिजिटल रेस्ट) करण्यात येणार असल्याची भीती दाखविण्यात आली होती. या प्रकरणात कुटुंबीयांनाही अटक करण्यात येणार असल्याचे सांगून आरोपींनी ज्येष्ठ नागरिक आणि त्याच्या कुटुंबीयांनी तातडीने चोरट्यांनी दिलेल्या बँक खात्यात रक्कम जमा करावी, असे सांगितले.

# लोणी काळभोर मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याची आग कायम

## श्वसनाचा त्रास झाल्याने एमआयटीचे विद्यार्थी रुग्णालयात

**लोणी काळभोर, ता. १ :** लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील मुळा-मुठा नदीच्या पात्रात अवैधरित्या टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला शुक्रवारी (ता. २७) सकाळी भीषण आग लागल्याची घटना समोर आली. या आगीमुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पसरले असून श्वास घेण्यास त्रास झाल्याने एम आयटी शिक्षण संकुलातील काही विद्यार्थ्यांना शुक्रवारी मध्यरात्री जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. एमआयटी शिक्षण संकुलातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न शनिवारीदेखील सुरू होते.



एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले जवळपास २० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास ५ हजार विद्यार्थी व १ हजार कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग अग्निशमन दलाने शुक्रवारी दिवसभर प्रयत्न करूनही विझवता आली नाही. त्यामुळे रात्री ती आणखी वाढून विषारी धुराचे प्रचंड मोठे लोट परिसरात जमा झाले. यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला. तसेच, शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करण्यात आले.

विषारी वायूच्या लोटांमुळे परिसरातील दृश्यमानता प्रचंड कमी झाली. याचा परिणाम शनिवारी पहाटे पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतुकीवरही झाला. तसेच, या विषारी धुराच्या लोटांमुळे परिसरातील एका कंपनीच्या कर्मचाऱ्यांना व एमआयटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांना शनिवारी सुट्टी द्यावी लागली. शनिवारी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीचे सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, पोलिस पाटील व स्थानिक अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छता आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू असताना, लोणी काळभोर येथे मात्र पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर थेट कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आला आहे. लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या पुणे शहराला लागून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा निर्माण होतो. परंतु या ठिकाणी कचरा संकलनासाठी जागा तसेच कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प आजमितीस उपलब्ध नाही.

त्यामुळे नाइलाजास्तव दररोज सुमारे ३० ते ३५ ट्रॉलींहून अधिक कचरा थेट मुळा-मुठा नदीपात्रात टाकला जातो. परिणामी, नदीपात्रात आता कचऱ्याचे मोठे ढीग तयार झाले असून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यात आता या कचऱ्याला सातत्याने आग लागण्याचे प्रकार वाढत असल्याने वायुप्रदूषणातही कमालीची वाढ झाली असून परिसरातील नागरिकांना श्वास घेणेही कठीण झाले आहे. नदीपात्रात कचरा टाकल्यामुळे केवळ वायुप्रदूषणच नव्हे, तर जलप्रदूषणही वाढत असून मुळा-मुठा नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे जलचरांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे.

> लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती या दोन्ही ग्रामपंचायतींनी यापूर्वीच अनेक वेळा घनकचरा व्यवस्थापनासाठी वेगळी जागा मिळावी यासाठी जिल्हा परिषद व जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवले आहेत. तो अद्यापही शासन दरबारी प्रलंबित आहे. शासनाकडून दोन्ही ग्रामपंचायतींना तातडीने जागा मिळाल्यास त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारता येईल. त्यामुळे मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे बंद होईल व पर्यावरणाचा ऱ्हास थांबून परिसरातील नागरिकांचे आरोग्य आबाधित राहील.
> - **चित्तरंजन गायकवाड,** माजी सरपंच, कदमवाकवस्ती ग्रामपंचायत

> पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. नदीपात्रात कचऱ्याचे डोंगर उभे असून त्यास सातत्याने आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे विषारी धुराचे लोट तयार होऊन विद्यापीठातील विद्यार्थ्यांना श्वसनाच्या समस्या जाणवत आहेत. जिल्हा प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने हस्तक्षेप करावा. नदीपात्रात अवैधरित्या थेट कचरा टाकणे त्वरित थांबवण्यात यावे. विद्यार्थी व परिसरातील नागरिकांचे आरोग्य राखण्यासाठी स्थानिक ग्राम पंचायतींच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी.
> - **डॉ. महेश चोपडे,** कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे.

# पिंपरी-चिंचवडच्या वीज सक्षमीकरणाला बुस्टर : राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन

**पिंपरी-चिंचवड, ता. १ :** पिंपरी-चिंचवडसह भोसरी विधानसभा मतदारसंघातीलवाढत्या औद्योगिक व निवासी वीज समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र शासन सकारात्मक आहे. नवीन प्रस्तावित विकासकामे आणि पायाभूत प्रकल्पांसाठी आवश्यक निधीची पूर्तता करण्यात येईल. तसेच, वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी दिले.




महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने नियम १०५' अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरातील वीज पुरवठा सक्षमीकरणाच्या अनुशंगाने विविध मागण्याची लक्षवेधी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात मांडली. त्याला मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांनी लेखी उत्तर दिले आणि वीज यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्याचे संकेत दिले.


गणेशखिंड शहर मंडळांतर्गत भोसरी, चहोली, मोशी, तळवडे, चिखली आदी भागांमध्ये सध्या औद्योगिक, व्यावसायिक व निवासी अशा एकूण ४,५३,८२० ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. यामध्ये ५८० उच्चदाब ग्राहक आहेत. महापारेषणच्या चार २२० के.व्ही. उपकेंद्रांद्वारे भोसरी आर एस-१ (२७५ एम.व्ही.ए.), भोसरी आर एस-२ (१५० एम.व्ही.ए.), टेल्को (१५० एम.व्ही.ए.), चिंचवड आर एस (२३० एम.व्ही.ए.) : एकूण ८०५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमता उपलब्ध असून सध्याची मागणी ६२७ एम.व्ही.ए. पर्यंत पोहोचली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे भविष्यातील ताण लक्षात घेता अतिरिक्त पायाभूत सुविधा उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. २०० केव्ही मोशी आणि २०० केव्ही चऱ्होली येथे उपकेंद्र तयार केली आणि प्रस्तावित सदरची कामे पूर्ण केल्यानंतर वीज समस्या सोडवण्यास मदत होईल, असेही बोर्डीकर- साकोरे यांनी म्हटले आहे.

पान २ वर

> पिंपरी-चिंचवडमधील वाढत्या शहरीकरणाचा विचार करुन वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर पुरवण्याचे आणि महावितरणच्या विविध शाखा कार्यालय देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच झाले आहे. चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकसित झाला. तसेच, पुनावळे-रावेत- किवळे- वाकड हा रेसिडेन्सिअल कॉरिडॉर वाढतो आहे. दोन्ही कॉरिडॉरमध्ये इलेक्ट्रिक इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजींच्या नेतृत्त्वात भाजपा महायुती सरकारने ठोस निर्णय घेतले आणि कामही सुरू केले आहे. प्रस्तावित कामांना मंजुरी आणि निधीची उपलब्धता करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल मुख्यमंत्री साहेब आणि राज्य शासनाचे आभार मानतो.
> - **महेश लांडगे,** (आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे)

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

**पुणे, ता. १ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे आणखी एक मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांची पुणे जिल्हा शिक्षण मंडळच्या अध्यक्षपदी आज बिनविरोध निवड करण्यात आली.



मंडळाच्या सभासदांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत त्यांची एकमताने निवड झाली. गेली सुमारे २० वर्षे या मंडळाचे अध्यक्षपद अजित पवारांकडे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. अद्ययावत शाळा इमारती उभारणे, शैक्षणिक सुविधा वाढवणे आणि एक लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, अशी कामगिरी त्यांच्या कार्यकाळात झाली. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर त्यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली असून बीड आणि पुणे जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारीही त्यांच्याकडे आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदासह विविध संस्थांमध्ये त्यांनी यापूर्वीही जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आज सकाळी प्रथमच शिक्षण मंडळाचा आढावा घेतला. विविध उपक्रमांची माहिती घेऊन भविष्यातील योजना जाणून घेतल्या. दादांनी सुरू केलेले काम अधिक वेगाने आणि व्यापक पातळीवर पुढे नेऊ, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, बैठकीनंतर त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुणे कार्यालयात जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समिती सभापती निवडीसंदर्भातील बैठकीस उपस्थित राहणार होत्या. मात्र अमित शहा यांच्या मुंबईतील संभाव्य दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर त्या तातडीने मुंबईकडे रवाना झाल्या.

# आता विधानसभा निवडणूक लढवणार नाही; माजी मंत्री बबनराव लोणीकर

**परतूर, ता. १ :** परतूरचे भाजप आमदार आणि माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी विधानसभा निवडणूक न लढवण्याची घोषणा करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. मी म्हातारा झालो नाही, पण इथून पुढे विधानसभा निवडणूक लढवणार नाही. आता पोरगं वेटिंगवर आहे, असं स्पष्ट वक्तव्य लोणीकर यांनी केले.



लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त जालन्यातील वाटूर येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात त्यांची लाडू तुला करण्यात आली. याच व्यासपीठावरून बोलताना त्यांनी राजकीय निवृत्तीचे संकेत देत तरुणांना संधी देण्याची वेळ आल्याचे म्हटले. मी थकलो नाही, पण आता नव्या पिढीला संधी मिळाली पाहिजे. माझे चिरंजीव निवडणुकीसाठी सज्ज आहेत, असं म्हणत त्यांनी मुलासाठी जागा मोकळी करण्याचा इशारा दिला.

विधानसभा निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले असले तरी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षाने संधी दिल्यास लोकसभा निवडणूक लढवण्यास मी तयार आहे, असं सांगत त्यांनी केंद्राच्या राजकारणात जाण्याची इच्छा व्यक्त केली. परतूर विधानसभा मतदारसंघात लोणीकर यांची मजबूत पकड आहे. मात्र, त्यांनी स्वेच्छेने माघार घेतल्यास त्या मतदारसंघात नव्या नेतृत्वाचा उदय होण्याची शक्यता आहे. त्यांच्या या विधानामुळे जालना जिल्ह्याच्या राजकारणात पुढील काळात मोठे फेरबदल होण्याची चर्चा सुरू झाली आहे.

# पुणे - सोलापूर महामार्गावरील प्रयागधाम फाट्यावर ट्रक, टँकर व कंटेनरचा विचित्र अपघात

**उरूळी कांचन, ता, १ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील प्रयागधाम फाट्यावर पहाटे ट्रक, टँकर व कंटेनर या तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. याप्रकरणी कंटेनर चालकावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रविवारी (ता. ०१) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली.



कंटेनर टेलर क्र. एमएच ०४ केएफ १२४१ वरील चालक मलक मंडल रा. बरनबारिया, बरनबेरिया जि. नाडिया राज्य पश्चिम बंगाल) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कंटेनर चालकाचे नाव आहे. याप्रकरणी रेवणसिद्ध मल्हारी जाधव (वय ३, धंदा ड्रायव्हर रा. बारामती, कुंभारकर वस्ती एमआयडीसी ता. बारामती जि. पुणे) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेवणसिद्ध जाधव हे ट्रक (एमएच ११ एएल ६१२१) मधून २३० गोळी पेंडच्या बॅगा घेऊन बारामतीहून राजगुरूनगरकडे निघाले होते. रविवारी पहाटे सुमारे पाच वाजता प्रयागधाम फाटा येथे उजवीकडे वळण्यासाठी इंडिकेटर देऊन महामार्ग क्रॉस करण्यासाठी ते थांबले होते.

पाठीमागुन एक कंटेनर भरधाव वेगात आला व ट्रकचे पाठीमागील बाजुस जोरदार धडक दिली. तेव्हा जाधव यांच्या ताब्यातील ट्रक पुणे सोलापुर हायवे रोडचे लेनवर गेली. त्यावेळेस पुणे बाजुकडुन सोलापुर बाजुकडे जाणारे एका टँकरने ट्रकला डावे बाजुने जोरदार धडक दिली. त्यामुळे ट्रक पल्टी होवुन तिन्ही वाहनांचा अपघात झाला.

अपघातात तिन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कंटेनर चालक मलक मंडल (रा. पश्चिम बंगाल) यास किरकोळ दुखापत झाली असून उपचारासाठी पाठविण्यात आले. फिर्यादी चालक सुखरूप बचावले. सदर वाहनांचे चालकांची नावे नरहरी आन्ना नांदे, रा. पाहाडी दहीफळ, पोस्ट पाहाडी पारगाव, ता. धारूर, जि. बीड) व मलक मंडल रा. बरनबारीया, बरनबेरीया जि. नाडीया, राज्य पश्चिम बंगाल) असल्याची माहिती मिळाली. घटनेनंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

दरम्यान घटनेची माहिती पोलिसांनी कळवली यावेळी तातडीने घटनास्थळी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक अनिल खोमणे, पोलीस हवालदार उद्धव गायकवाड, निलेश जाधव, हरिष शितोळे, राजकुमार भिसे यांनी घटना स्थळी धाव घेतली व वाहतूक सुरळीत केली. याप्रकरणी कंटेनर चालकावर बीएनएस २०२३ कलम २८१, १२५ (a), ३२४ (४), ३२४ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार लगस करीत आहेत.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### अनियमितता आढळल्याने अपंगांच्या दोन शाळा कायमच्या बंद; तुकाराम मुंढेंचा दणका

**लातूर, ता. १ :** लातूर जिल्ह्यातील श्रवण आणि वाकबधीर मुलांसाठी असलेल्या दोन सरकारी अनुदानित शाळा अनियमितते मुळे बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले. अपंग कल्याण सचिव तुकाराम मुंढे यांनी चौकशीनंतर हा आदेश जारी केला.उदगीर येथील राजर्षी शाहू निवासी मुकबधीर विद्यालयात अपंग कल्याण आयुक्तांनी केलेल्या तपासणीत या संस्थांमध्ये अपुरी विद्यार्थी संख्या, सरकारी पोर्टलवर विद्यार्थी नोंदणीचा अभाव आणि बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा अभाव यासह अनेक अनियमितता उघडकीस आल्या. तसेच, संत गाडगेबाबा निवासी कर्णबधीर विद्यालयाने मध्ये कालबाह्य झालेल्या नोंदणीचे नूतनीकरण केले नसल्याचेही चौकशीत आढळून आले. त्यानंतर या दोन्ही शाळा बंद करण्याचे आदेश देण्यात आले. आदेशांची अंमलबजावणी न केल्यास संस्थांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही मुंढे यांनी दिला आहे.

### पुण्यातील मार्केट यार्डातील भाजीपाला आणि फळ बाजार मंगळवारी बंद

**पुणे, ता. १ :** पुणे बाजार समितीचा मुख्य बाजार असलेल्या मार्केट यार्डातील फळे, भाजीपाला, फुल, पान, केळी आणि मोशी उपबाजार मंगळवारी (ता. ३) धुलिवंदनमुळे दरवर्षीप्रमाणे यावर्षीहि बंद राहणार आहे. याबाबतचे पत्रक सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांच्या सहीने काढण्यात आले आहे. तरी शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीस आणू नये, तसेच, व्यापाऱ्यांनी खरेदीस आणू नये, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाच्य वतीने करण्यात आले आहे.

### द केरळ स्टोरी २च्या कमाईत दुसऱ्या दिवशी मोठी वाढ

**पुणे, ता. १ :** विपुल अमृतलाल शाह निर्मित द केरळ स्टोरी हा चित्रपट वादानंतर २७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालाय. प्रदर्शनापूर्वी प्रकरण केरळ उच्च न्यायालय पर्यंत पोहोचले होते. अखेरीस स्थगिती मिळाल्यानंतर चित्रपटाचा मार्ग मोकळा झाला. बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवशी चित्रपटाला सौम्य प्रतिसाद मिळाला. सॅकनिल्कच्या अहवालानुसार, ओपनिंग डे ला केवळ ७.५ लाख रुपयांची कमाई झाली. मात्र दुसऱ्या दिवशी कमाईत मोठी वाढ झाली आणि अंदाजे ४.६५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. दोन दिवसांत एकूण ५.४० कोटी रुपयांची कमाई करत चित्रपटाने दुसऱ्या दिवशी जोरदार उभारी घेतल्याचे चित्र दिसत आहे.

### इराण-अमेरिका युद्धामुळे सोनं-चांदी महागलं

**इराण, ता. १ :** इराण-अमेरिका तणावाचा थेट परिणाम सराफा बाजारावर दिसू लागलाय. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे सोन्या-चांदीच्या दरात ऐतिहासिक वाढ झालीय. गेल्या २४ तासांत सोन्याच्या दरात तब्बल ११ हजार रुपयांची वाढ झाली असून जीएसटीसह प्रति १० ग्रॅम दर १ लाख ७५ हजार रुपयांवर पोहोचलाय. तर चांदीच्या दरात २५ हजार रुपयांची उसळी घेत ती ३ लाख ३ हजार रुपयांवर गेलीय. लग्नसराईच्या तोंडावर झालेल्या या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडलेय. तज्ज्ञांच्या मते, तणाव कायम राहिल्यास सोन्याचे दर २ लाखांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

### इराणच्या सर्वोच्च नेतेपदी अयातुल्ला अराफी

**नवी दिल्ली, ता. १ :** अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर अयातुल्ला अलीरेजा अराफी यांची इराणच्या सर्वोच्च नेतेपदी तात्पुरती नियुक्ती करण्यात आलीय. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर काही तासांतच हा निर्णय घेण्यात आलाय. ६७ वर्षीय अराफी हे अनुभवी धर्मगुरू असून खामेनी यांचे निकटवर्तीय मानले जातात. ते तज्ज्ञांच्या सभेचे उपाध्यक्ष आणि इराणच्या मदरसा व्यवस्थेचे प्रमुख आहेत. शनिवारी झालेल्या अमेरिका-इस्त्रायल लष्करी हल्ल्यात इराणचे नेतृत्व करणारे ८६ वर्षीय खामेनी ठार झाले. या कारवाईत लष्करी तळ, सरकारी सुविधा आणि वरिष्ठ कमांड साइट्सना लक्ष्य करण्यात आले.

### एसटी प्रवाशाची सोनसाखळी चोरी

**पिंपरी, ता. १ :** एसटी प्रवाशाच्या गळ्यातील ८३ हजार रुपयांची सोनसाखळी चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना वाकडेवाडी एसटी स्थानकाच्या आवारात घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार हे मूळचे नाशिकचे आहेत. ते फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास वाकडेवाडी एसटी स्थानकाच्या आवारात थांबले होते. त्या वेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरून नेली. पोलीस कर्मचारी तागड तपास करत आहेत.

# तक्रारवाडी स्मशानभूमीत अखेर उजेड रस्त्याची दुरवस्था कायम

सागर जगदाळे



भिगवण, ता. ०१ : तक्रारवाडी स्मशानभूमीतील अंधार आणि सोलर हायमास्ट दिवे बंद पडल्याबाबत पुणे प्राईम न्यूजने नुकतीच बातमी प्रसिद्ध केली होती. या बातमीची तात्काळ दखल घेत तक्रारवाडीचे सरपंच शरद वाघ यांनी संबंधित ठेकेदाराशी संपर्क साधून सोलर हायमास्ट दिवे तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना दिल्या.

सदर सोलर हायमास्ट दिव्यांच्या बॅटऱ्या खराब झाल्यामुळे दिवे अनेक महिन्यांपासून बंद होते. त्यामुळे रात्रीच्या अंधारात स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करताना ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या गंभीर प्रश्नावर पुणे प्राईम न्यूजने प्रभावीपणे आवाज उठवल्यानंतर ठेकेदाराने तातडीने बॅटऱ्या बदलून नवीन यंत्रणा बसवली. परिणामी स्मशानभूमी परिसरात पुन्हा एकदा उजेड पडला असून अंधार दूर झाला आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनाही अंत्यविधीप्रसंगी टॉर्चच्या उजेडात जावे लागल्याची घटना समोर आली होती. या पार्श्वभूमीवर या प्रश्नाचे गांभीर्य अधिक ठळक झाले होते.

स्मशानभूमी परिसरातील अंधार दूर झाला असला तरी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता मात्र अद्याप समस्याग्रस्त आहे. गावापासून स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून रात्री दिवाबत्ती नसल्यामुळे अंत्यविधीसाठी मृतदेह घेऊन जाताना मोठी अडचण निर्माण होते. एखाद्या दिवशी अपघातासारखी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

दरम्यान, स्मशानभूमीतील दिव्यांप्रमाणेच रस्त्याच्या दुतर्फा दिवाबत्तीची सोय करावी तसेच रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पुणे प्राईम न्यूजने उचललेला मुद्दा प्रशासनापर्यंत पोहोचून त्यावर कार्यवाही झाली, हा या बातमीचा सकारात्मक परिणाम मानला जात असला तरी तक्रारवाडीतील विकासाचा प्रवास अजून अपूर्ण असल्याचे वास्तव समोर येत आहे.

> ग्रामपंचायत तक्रारवाडीचा कारभार स्वीकारून आठ दिवस होताच प्राथमिक गरज ओळखून स्मशानभूमीतील अंधार दूर करण्यासाठी ठेकेदाराशी संपर्क साधून सोलर हायमास्ट दिवे त्वरित सुरू करण्यात आले. आता प्रश्न आहे तो रस्त्याचा. तोही लवकरच मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल. रस्ता वन खात्याच्या हद्दीतून जात असल्यामुळे काही पाठपुरावा आवश्यक आहे. त्यासाठी वन खात्याशी पत्रव्यवहार करून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.
> - **शरद वाघ,** सरपंच, तक्रारवाडी

### खामेनींच्या मृत्यूचे पाकिस्तानमध्ये पडसाद

**नवी दिल्ली, ता. १ :** अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर पाकिस्तानमध्ये तीव्र पडसाद उमटलेत. कराची शहरात शिया समुदायाकडून मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी अमेरिकन वाणिज्य दूतावास कराची बाहेर जमून अमेरिकेविरोधात घोषणाबाजी केली. तणाव वाढताच काही आंदोलकांनी कॉन्सुलेट परिसरात घुसून तोडफोड केल्याची माहिती आहे. या हिंसाचारात १४ जणांचा मृत्यू तर २० जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला तसेच गोळीबार केल्याचेही समोर आलंय. परिसरातील प्रमुख रस्ते बंद करण्यात आले असून अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलाय.

# सासवड बसस्थानकात एस. टी. चालकावर लोखंडी वस्तूने जीवघेणा हल्ला

## तिघांवर गुन्हा दाखल

**सासवड, ता. १ :** आम्ही गावचे लोक आहोत अशी दादागिरी करत लोखंडी वस्तूने एस.टी. चालकावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना भरदुपारी घडली. या घटनेत चालकाच्या डोक्यातून रक्त येईपर्यंत मारहाण करण्यात आली होती. शुक्रवारी (ता. २७) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास सासवड आगार येथे घडली. याप्रकरणी तिघांवर सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहन मारुती जाधव २) तेजस जगताप ३) सत्यम जगताप (रा. तिघेही, सासवड, ता. पुरंदर) अशी मारहाण करणाऱ्या व गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी एसटी चालक सचिन शामराव नाळे असे मारहाण झालेल्या चालकाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांनी सासवड पोलीस ठाण्यत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एस.टी. चालक सचिन नाळे हे मागील १४ वर्षापासुन परिवहन महामंडळात फलटण आगार येथे कामास आहेत. शुक्रवारी (ता. २७) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास सासवड आगार या ठिकानी आले असता हडपसर बाजुकडुन एक पांढ-या रंगाची कार गाडी अचानक एस.टी. बस.चे समोर आडवी आली. त्यावेळी एस.टी. थांबविली व त्या कारला जावु दिले. त्यावेळी मी त्यांना अरे हळु चालवा असे म्हणालो व त्याकार मधील अनोळखी चालकाने हात बाहेर काढला व ते सासवड बाजुकडे निघुन गेले.

एस.टी.बस.स्टॅन्ड मध्ये गाडी फलाट ला लावली व नोंदबुक करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या पाठीमागे तीन अज्ञात तरुण अचानक शिवीगाळ करत एकेरी भाषेत तुला माहीत आहे का? आम्ही इथले गाववाले आहोत वामन जगतापची मानसे आहोत. अश्लील शिव्या देत एकाने एकाने पाठिमागुन लाथ मारली व पुढील एकाने त्याचे हातातील कसलीतरी लोखंडी वस्तूने कपाळावर डाव्या भुवईवरती मारहाण करण्यास सुरुवात केली.

यावेळी चक्कर आली व कपाळातुन रक्त येवु लागले. यावेळी वाहकाने मध्यस्ती केली असता त्यांनाहि मारहाण केली. व मोबाईल फोन खाली पाडला. यावेळी त्या ठिकाणी असलेल्या काही नागरिकांनी एकाला पकडुन पोलीसांचे ताब्यात दिले. त्यानंतर वाहक मोरे यांनी सासवड सरकारी रुग्नालय येथे घेवुन गेले.

दरम्यान, याप्रकरणी वरील तिघांवर सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर एस.टी. कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत असून सार्वजनिक सेवकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आलाय. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### पीएमपी प्रवासी ज्येष्ठाला धक्काबुक्की करुन ५० हजारांची रोकड लुटली


**पुणे, ता. १ :** पीएमपी प्रवासी ज्येष्ठाला धक्काबुक्की करुन चोरट्यांनी ५० हजारांची रोकड लुटल्याची घटना विश्रांतवाडी भागात घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७३ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे विश्रांतवाडीतील धानोरी भागात राहायला आहेत. ते २६ फेब्रुवारी रोजी दुपारी विश्रांतवाडी ते कोथरूड या मार्गावरील बसमधून प्रवास करत होते. बस प्रवासात चोरट्यांनी त्यांना धक्का दिला. धक्काबुक्की करुन खिशातील ५० हजारांची रोकड काढून घेतली. चोरटे शांतीनगर परिसरातील बस थांब्यावर उतरुन पसार झाले. घाबरलेल्या ज्येष्ठाने पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलीस हवालदार भोसले तपास करत आहेत.

### तरुणाच्या तत्परतेमुळे रोकड लुटीचा डाव उधळला; चंदननगर भागातील घटना

**पुणे, ता. १ :** बँकेतून निघालेल्या तरुणाकडील १५ लाख रुपयांची रोकड लुटण्याचा डाव नागरिकांच्या तत्परतेमुळे उधळला गेला. चंदननगर परिसरात ही घटना घडली. प्रसंगावधान राखून तरुणाने विरोध केल्यानंतर चोरटे दुचाकीवरून पसार झाले.




याबाबत एका तरुणाने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार वर्षीय तरुण एका खासगी कार्यालयात नोकरी करतो. तो वडगाव शेरी परिसरात राहायला आहे. २७ फेब्रुवारी रोजी कार्यालयीन कामकासाठी त्याला बँकेतून रोकड काढून आणण्यास सांगितले होते. रोकड काढल्यानंतर तो दुपारी दोनच्या सुमारास वडगाव शेरीतील श्री हनुमान मंदिर परिसरात आला. त्या वेळी दोन दुचाकीवरून चौघे जण आले. एका चोरट्याने तरुणाला तीक्ष्ण शस्त्राचा धाक दाखविला.

तक्रारदार तरुणाला धमकावून चोरट्याने त्याच्याकडील १५ हजारांची रोकड असलेली पिशवी हिसकावून नेण्याचा प्रयत्न केला. तरुणाने प्रसंगावधान राखून चोरट्याला धक्का दिला. दुचाकीवरील दोन चोरटे रस्त्यात पडले. त्यानंतर तक्रारदार तरुणाने दुचाकी सुरू केली. त्याने ऑक्सिजन पार्कजवळील एका चहाच्या टपरीवर दुचाकी थांबविली.

तरुणाचा पाठलाग करत दुचाकीवरून चोरटे तेथे आले. त्यांनी तरुणाला मारहाण करून रोकड असलेली पिशवी हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्याचा आरडाओरडा ऐकून नागरिक तेथे जमा झाले. नागरिकांच्या लक्षात हा प्रकार आला. त्यांनी चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. दुचाकीस्वार चोरटे तेथून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक विकास बाबर तपास करत आहेत.

### पिंपरी–चिंचवडच्या वीज सक्षमीकरणाला बुस्टर : राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन

**पान १ वरुन**

**नव्या उपकेंद्रांना हिरवा कंदील...**

ऊर्जा विभागाच्या माहितीनुसार पुढील प्रकल्पांना गती दिली जाणार आहे: सफारी पार्क, मोशी येथे अतिउच्चदाब उपकेंद्र मोशी, डुडुळगाव, आकुर्डी, चिखली, तळवडे परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर होणार आहे. चहोली येथे नवीन अतिउच्चदाब उपकेंद्र भोसरी, चहोली, दिघी, धानोरी भागात पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होणार आहे. सेंच्युरी इंका अतिउच्चदाब उपकेंद्रात दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याचा प्रस्ताव भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा. मध्यम दाब स्विचिंग स्टेशनसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**भूमिगत वीजवाहिन्यांचा महत्त्वाकांक्षी आराखडा**

भोसरी गावठाणातील ओव्हरहेड वीजवाहिन्या आरडीएसएस योजनेंतर्गत टप्प्याटप्प्याने भूमिगत करण्यात येणार आहेत. तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फीडर व भूमिगत केबल टाकण्याचे काम तातडीने हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे वारंवार होणारे वीजखंडित प्रकार कमी होतील. औद्योगिक उत्पादनात सातत्य राहील. निवासी भागात सुरक्षित आणि स्थिर वीजपुरवठा मिळेल. विशेष म्हणजे, वाढत्या शहरीकरणाचा विचार करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक असून संबंधित प्रस्तावांना प्राधान्याने मान्यता देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

**वीज चोरीच्या प्रकारांना लगाम घाला**

कुदळवाडी परिसरात भारतातील सर्वांत मोठी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये सुमारे ९०० एकर क्षेत्र रिकामे करण्यात आले. कुदळवाडीच्या जवळपास ५ हजार अवैध मिळकती होत्या. त्या परिसरात केवळ ९०० अधिकृत वीज कनेक्शन होते. अनधिकृत वीज कनेक्शन ३ हजार ८०० हून अधिक होती. याची नोंद महावितरणकडे आहे. वीज चोरीच्या प्रकारांना लगाम घातला पाहिजे. नवीन केबल, वीज कर्मचाऱ्यांचा अभाव, देखभाल-दुरूस्तीची कामांत दिरंगाई अशा समस्या आहेत. त्यावर ठोस उपायोजना करण्यासाठी लघु उद्योजक संघटना, स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे केली. यावर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर- साकोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# पुणे मेट्रोचा कोंढवायेवलेवाडी २० किमीचा भव्य विस्तार प्रस्तावित

**पुणे, ता. १ :** दक्षिण पुण्यातील कोंढवा आणि येवलेवाडी परिसरातील नागरिकांसाठी मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. महा मेट्रो कडून शिवाजीनगर ते येवलेवाडी असा सुमारे २० किमी लांबीचा उन्नत मेट्रो मार्ग उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. सर्व प्रशासकीय मंजुरी आणि सर्वेक्षण वेळेत पूर्ण झाल्यास २०३०-३१ पर्यंत ही सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



प्रस्तावित मार्ग शिवाजीनगरपासून जिल्हाधिकारी कार्यालय, कॅम्प आणि पुलगेट मार्गे कोंढवा ते येवलेवाडीपर्यंत नेण्यात येणार आहे. या विस्तारामुळे दक्षिण पुण्यातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

हा विस्तार सध्या सुरू असलेल्या हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्ग (२३ किमी) प्रकल्पाचा एक भाग असेल. हिंजवडी ते शिवाजीनगर हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर राबवला जात असला तरी कोंढवायेवलेवाडी टप्पा थेट महा मेट्रो कडून पूर्ण केला जाणार आहे.

या मुख्य मार्गासोबत ज्योती चौक ते एनआयबीएम जंक्शन आणि पुढे बिशप विद्यालयाजवळ उंड्रीपर्यंत अतिरिक्त स्पर मार्ग प्रस्तावित आहे. त्यामुळे एनआयबीएम, उंड्री आणि आसपासच्या वाढत्या निवासी भागांना थेट मेट्रो कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. सध्या दर एक किलोमीटर अंतरावर स्थानके उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे स्थानिक प्रवाशांना सहज प्रवेश मिळेल.

दरम्यान, कोंढवा परिसरात सध्या मेट्रो सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना वाहतूक कोंडी, वाढता प्रवास वेळ आणि सार्वजनिक वाहतुकीच्या मर्यादा यांचा सामना करावा लागत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास दक्षिण पुण्यातील वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# लोणी काळभोरमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

लोणी काळभोर, ता. १ : ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय मध्ये मराठी विभागाच्या वतीने शुक्रवारी (ता. २७)मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शन, भित्तीपत्रिका उद्घाटन आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत करणारे विविध उपक्रम यामुळे परिसरात मराठीप्रेमाचा जागर निर्माण झाला.



या कार्यक्रमाची सुरुवात प्रा. डॉ. विजयकुमार घोडके यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी मराठी भाषेचा अभिजात ते आधुनिक असा प्रवास उलगडून सांगत तिच्या समृद्ध परंपरेचा वेध घेतला. तंत्रज्ञानाच्या युगातही मराठी भाषा कशी सक्षमपणे पुढे जात आहे, याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण त्यांनी मांडले. विद्यार्थिनी सुमित्रा गुरव, जान्हवी पवार, मदिहा सय्यद, सानिया मड्डे आदींनी मराठी भाषेचा गौरव करणाऱ्या कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी मराठी भाषेच्या उगम व विकासाचा सखोल आढावा घेतला. आठव्या शतकातील शिलालेखांपासून मराठीचा इतिहास दिसून येतो, असे सांगत त्यांनी विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी आणि लीळाचरित्र यांसारख्या ग्रंथांचा उल्लेख केला. तसेच नाणेघाट व श्रवणबेळगोळ येथील शिलालेखांचा संदर्भ देत मराठी भाषेची प्राचीनता अधोरेखित केली.

दरम्यान,मराठी भाषेचा अभिमान जपण्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी मराठीत करण्याचा संकल्प केला. या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मराठी साहित्यातील विविध पैलू दर्शवणाऱ्या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथपाल सौ. निलीमा हेमाडे व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठीतील दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात आले. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास मोठी गर्दी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मुकेश महाले यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी भाषेचा अभिमान आणि वाचन संस्कृतीची जोपासना यांचा संगम घडवणारा हा कार्यक्रम यशस्वी ठरला.

# एलपीजी सिलिंडर महागले; घरगुतीच्या किमतीत कोणताही बदल नाही

**मुंबई, ता. १ :** देशातील सर्व तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढवल्या आहेत. गॅस सिलिंडरच्या किमती २८ रुपयांनी वाढवून ३१ रुपये करण्यात आल्या आहेत, नवीन किमती देखील आजपासून म्हणजेच १ मार्चपासून लागू झाल्या आहेत. तथापि, ही वाढ फक्त १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरवर झाली आहे. घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्लीत १९ किलोच्या एलपीजी सिलिंडरची किंमत १७४०.५० रुपयांवरून १७६८.५० रुपये झाली आहे.

दिल्ली व्यतिरिक्त, कोलकाता मध्ये १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आजपासून १८५७.५० रुपये झाली



आहे, जीपूर्वी १८४४.५० रुपये होती. मुंबईत त्याची किंमत १६९२ रुपयांवरून १७२०.५० रुपये आणि चेन्नईमध्ये १८९९.५० रुपयांवरून १९२९ रुपये झाली आहे. तेल विपणन कंपन्यांचा हा निर्णय देशातील सर्व रेस्टॉरंट, हॉटेल आणि ढाबा चालकांसाठी मोठा धक्का आहे. होळीच्या सणाला आता फक्त दिवस उरले आहेत, अशा परिस्थितीत गॅसच्या किमती वाढल्याने रेस्टॉरंट, हॉटेल आणि ढाबा चालकांचा खर्च वाढेल. मात्र, सामान्य लोकांना जुन्या किमतीतच गॅस मिळेल.

घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत दिल्लीत ८५३.०० रुपये, कोलकातामध्ये ८७९.०० रुपये, मुंबईत ८५२.५० रुपये आणि चेन्नईमध्ये ८६८.५० रुपये आहे. याशिवाय, पीएनजी म्हणजेच पाईपद्वारे थेट स्वयंपाकघरात पोहोचणाऱ्या गॅसच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्लीत पीएनजीची सध्याची किरकोळ किंमत प्रति एससीएम ४८.५९ रुपये, नोएडामध्ये प्रति एससीएम ४८.४६ रुपये, गुरुग्राममध्ये प्रति एससीएम ४७.४० रुपये, कानपूरमध्ये प्रति एससीएम ४९.९५ रुपये आणि अजमेरमध्ये प्रति एससीएम ५०.२७ रुपये आहे.

# शासनाने साखर उद्योगासमोरील अडचणी सोडवाव्यात : हर्षवर्धन पाटील

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. २८ : राज्यातील साखर उद्योग सध्या अडचणीत असून, चालु गळीत हंगामातील सुमारे रु.४५०० कोटीची थकबाकी रक्कम ऊस उत्पादन शेतकऱ्यांना अदा करणेसह विविध अडचणींवर मार्ग काढणेसाठी तातडीने उपाययोजने आवश्यक आहे. यासंदर्भात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बुधवारी (दि.४) बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. साखर उद्योगासमोरील अडचणी सोडविणेसाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी शनिवारी केले.

मुंबईत आठवड्यापूर्वी हर्षवर्धन



पाटील, जयंतराव पाटील यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची भेट घेऊन त्यांचे समोर साखर उद्योगातील अडचणी मांडून त्या सोडविणे संदर्भात चर्चा केली, त्यानुसार बुधवारी होणाऱ्या बैठकीला साखर उद्योगाशी संबंधित इतर सर्व खात्यांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सदर बैठकीत साखर उद्योगाला दिलासा देणारे निर्णय होणे अपेक्षित असल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले. हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, १५ फेब्रुवारी अखेर राज्यातील १५७ साखर कारखान्यांची सुमारे रु.४६०१ कोटी थकबाकी रक्कम शेतकऱ्यांना देय होती, आता सदरची थकबाकी रक्कम रु. ५००० कोटीच्या पुढे गेली आहे. त्यामुळे शासनाने कारखान्यांना सॉफ्ट लोन द्यावे, उसाची एम.एस.पी.( किमान विक्री किंमत) वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, साखर निर्यात करणेसाठी अनुदान द्यावे, इथेनॉलच्या तात्काळ दरवाढीसाठी केंद्राकडे पाठपुरावा करावा तसेच ऑइल कंपन्यांनी खरेदी करणाऱ्या इथेनॉल पैकी ५० टक्के इथेनॉल साखर उद्योगांकडून घेण्याची अट असावी, राज्य शासनाने पंजाब व इतर राज्यांप्रमाणे गाळप झालेल्या उसाला प्रति टन रु. ३०० अनुदान द्यावे, सहवीज निर्मिती प्रकल्पांतून महावितरणला निर्यात केल्या जाणाऱ्या विजेसाठी प्रति युनिटरु. १.५० इतके अनुदान राज्य शासनाने पुढे चालू ठेवावे आदी मागण्या शासनाकडे करण्यात आल्याची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली. तसेच साखर कारखान्यातील बँकांच्या कर्जाचे पुनर्गठण करावे, आगामी सन २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी कारखान्यांना खेळते भांडवल उपलब्ध होणेसाठी सॉफ्ट लोन द्यावे, आदी मागण्यांवरील बुधवारच्या बैठकीत चर्चा होऊन सकारात्मक निर्णय होणे अपेक्षित असल्याचे यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले. जलसंपदा विभागाने साखर कारखान्यांसाठी पाणीपट्टी दरात मोठी वाढ केली असून, वाढीव दरानुसार आता साखर कारखान्यांना प्रति घनमीटर पाणीपट्टीची मोठी रक्कम द्यावी लागणार आहे. या वाढीव पाणीपट्टीमुळे अगोदरच आर्थिक अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांच्या साखर उत्पादन खर्चात वाढ होणार आहे. त्यामुळे शासनाने केलेली वाढीव पाणीपट्टी रद्द करावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

### साखर कारखान्यांना प्रदूषण मंडळाचा नाहक त्रास

राज्यातील साखर कारखान्यांना राज्य शासनाच्या आखत्यारीतील प्रदूषण नियामक मंडळाकडून अनेकदा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे बुधवारी होणाऱ्या शासनाच्या बैठकीत या संदर्भातही साखर कारखान्यांना त्रास होऊ नये म्हणून चर्चा होणार असल्याची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

# बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करा व शेतकऱ्यांना दिवसा वीज द्या

## आमदार राहुल कुल यांची विधानसभेत मागणी

**पुणे, ता. २८ :** पश्चिम महाराष्ट्रात, विशेषतः पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात वाढलेल्या बिबट्यांच्या वावरामुळे शेतकरी आणि नागरिक प्रचंड दहशतीत आहेत. या गंभीर परिस्थितीवर तातडीने उपाययोजना कराव्यात आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी त्यांना रात्रीऐवजी दिवसा वीज पुरवठा करावा, अशी आग्रही मागणी आमदार राहुल कुल यांनी आज विधानसभेत औचित्याच्या मुद्याद्वारे केली.

दौंडचे आमदार राहुल कुल यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, पुणे जिल्ह्याच्या विविध भागांत बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. शेतात कामासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांवर बिबट्यांचे



हल्ले होत असून, यामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. शासनाने यावर उपाययोजना करण्याचे निश्चित केले असले तरी त्याची अंमलबजावणी अत्यंत वेगाने होणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी शेतात पाणी धरण्यासाठी जाताना बिबट्यांचा धोका सर्वाधिक असतो त्यामुळे शेतकऱ्यांच्या जिवाचे रक्षण करण्यासाठी वीज वितरण कंपनीने दिवसा वीज पुरवठा करावा. बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने पिंजरे लावणे, गस्त घालणे आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली. दरम्यान, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या आणि हक्काच्या प्रश्नावर शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास आमदार राहुल कुल यांनी यावेळी व्यक्त केला.

> राज्य सरकारने सामान्य शेतकऱ्यांच्या वीज बिलात सवलत किंवा माफी दिली आहे. मात्र, ग्रामीण भागातील जे छोटे शेतकरी एकत्र येऊन 'सहकारी वीज संस्थांच्या' माध्यमातून शेतीपंपाच्यासाठी वीज घेतात, त्यांना अद्याप ही सवलत मिळालेली नाही. हा शेतकरी अत्यंत लहान घटक असून, त्यांनाही वीज बिलातून माफी किंवा सवलत मिळावी, असा महत्त्वपूर्ण मुद्दा आमदार कुल यांनी मांडला.
> - **राहुल कुल,** आमदार

# बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी अभ्यास समितीची स्थापना

**मुंबई, ता. १ :** मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटचा आधार घेतल्यानंतर, आता त्याच धर्तीवर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी राज्य सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. बंजारा प्रवर्गातील उपवर्गांसह या समाजाचा एसटीमध्ये समावेश करण्याबाबतची कायदेशीर आणि तांत्रिक बाजू तपासण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय अभ्यास समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील बंजारा समाज सध्या विमुक्त जाती (अ) म्हणजेच 'व्हीजेएनटी' प्रवर्गात मोडतो. मात्र,




हैदराबाद गॅझेटमध्ये या जमातीचा उल्लेख आदिम असा असल्याने, आपल्याला अनुसूचित जमातीचे लाभ मिळावेत, अशी जुनी मागणी समाजाने लावून धरली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत यावर सविस्तर चर्चा झाली होती. त्या बैठकीतील निर्णयानुसार आता ही उच्चस्तरीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. डॉ. सी. जे. सोनोवाल (मानववंश शास्त्रज्ञ), डॉ. शैलेशकुमार दारोकर (समाजशास्त्रज्ञ), ॲड. नितीन गांगल (कायदेतज्ज्ञ) आदी मान्यवरांचा समितीत समावेश असेल. ही समिती बंजारा समाजाच्या सामाजिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून आपला अहवाल सरकारला सादर करेल. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला होता. याच गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख 'आदिम' जमात म्हणून असल्याचे समोर आले आहे. या कायदेशीर आधारामुळे बंजारा समाजाला 'एनटी'मधून 'एसटी' प्रवर्गात जाण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो, असा दावा समाजातील अभ्यासकांनी केला आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज



प्राईम लाईफ



## उन्हाळ्यात तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्यामुळे काय फायदे होतात

उन्हाळ्यात तांब्याच्या भांड्यातील पाणी पिणे ही आपल्या पारंपरिक आरोग्य पद्धतींपैकी एक महत्त्वाची सवय आहे. आयुर्वेदानुसार तांबे धातूमध्ये नैसर्गिक जीवाणूनाशक गुणधर्म असतात. त्यामुळे तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी शुद्ध राहण्यास मदत होते. विशेषतः उन्हाळ्यात पाण्यात जंतू वाढण्याची शक्यता जास्त असते, अशा वेळी तांब्याच्या भांड्यातील पाणी अधिक सुरक्षित मानले जाते.

तांब्याच्या पाण्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. ते पोटातील आम्लाचे प्रमाण संतुलित ठेवते आणि अपचन, ॲसिडिटी यांसारख्या तक्रारी कमी करते. तसेच शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते, ज्यामुळे शरीर हलके आणि ताजेतवाने वाटते.

तांबे हे सूक्ष्म प्रमाणात शरीरासाठी आवश्यक खनिज आहे. ते रक्तनिर्मिती, हाडांची मजबुती आणि सांध्यांचे आरोग्य यासाठी उपयुक्त ठरते. तांब्याचे पाणी त्वचेच्या आरोग्यासाठीही फायदेशीर मानले जाते, कारण ते शरीरातील अँटीऑक्सिडंट्स वाढवण्यास मदत करते.

उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढणे अत्यंत आवश्यक असते. तांब्याच्या भांड्यातील पाणी थंडावा देणारे आणि ताजेतवाने करणारे असते. मात्र हे पाणी अति प्रमाणात पिण्यापेक्षा योग्य प्रमाणात आणि स्वच्छ भांडे वापरूनच सेवन करावे. अशा प्रकारे उन्हाळ्यात तांब्याच्या भांड्यातील पाणी पिणे आरोग्यासाठी उपयुक्त ठरते.




## इंदापूर बाजार समितीत नव्या ज्वारीला उच्चांकी दर

### प्रति क्विंटल ६ हजार १ रुपयांची विक्री

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १ : रब्बी हंगामातील नव्या ज्वारीची आवक सुरू होताच इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत उत्साहवर्धक व्यवहार नोंदवले गेले. गुरुवारी (ता. २६) मुख्य बाजार, इंदापूर येथील भुसार मार्केटमध्ये झालेल्या खुल्या लिलावात ज्वारीला प्रति क्विंटल ६००१ रुपयांचा उच्चांकी दर मिळाला. जयसिंग पाटील यांच्या आडतीवर झालेल्या या व्यवहारामुळे हंगामाची सुरुवात समाधानकारक ठरली आहे. त्याच दिवशी गहू व हरभरा या शेतमालाचीही आवक सुरू झाली.

इंदापूर बाजार समितीच्या मुख्य बाजारासोबत भिगवण, निमगाव-केतकी व वालचंदनगर या उपबाजारांमध्ये भुसार, डाळींब, कांदा, मासळी, पेरू, सीताफळ, ड्रॅगन फ्रूट व फुले यांसारख्या विविध शेतमालाची मोठ्या प्रमाणावर उलाढाल होत असते. खुली लिलाव पद्धत, अचूक वजनमाप, पारदर्शक हिशोबपट्टी आणि विक्रीनंतर त्वरित रक्कम अदा करण्याची पद्धत यामुळे शेतकऱ्यांचा बाजार समितीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

शेतमालाची गुणवत्ता सुधारण्यासाठी अकलूज रोडलगतच्या बाजार आवारात प्रति तास ५ मेट्रिक टन क्षमतेचे धान्य सफाई यंत्र उभारण्यात आले आहे. तसेच शेतमाल तारण योजना कार्यान्वित असून शेतकऱ्यांना आर्थिक सुलभता मिळत आहे. मुख्य बाजार, इंदापूर तसेच शिवलिलानगर, भिगवण, राशीन रोड, निमगाव-केतकी व वालचंदनगर येथे उच्च क्षमतेचे भुईकाटा उपलब्ध असून २४ तास सेवा दिली जाते.

दरम्यान, मक्याच्या दरात घट झाल्याने बाजार समितीने हमीभाव दराने खरेदी केंद्र सुरू केले आहे. या निर्णयाबाबत शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. बाजार समितीच्या विविध योजना व उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके आणि माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांनी केले. संचालक व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# बारामतीत पाण्याच्या टाकीत लपविलेला २ कोटी ३५ लाखांचा ४७० किलो गांजा जप्त

**बारामती, ता. ०१ :** बारामती शहर परिसरात जळोची रस्ता भागातील एका भूखंडावर पाण्याच्या टाकीत लपविलेला २ कोटी ३५ लाख रुपये किमतीचा ४७० किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. याबाबत पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने याप्रकरणी शोधमोहीम सुरू केली आहे.

पोलिसांच्या कडक कारवाईमुळे आरोपींना तो टाकून पळ काढावा लागला. या संपूर्ण कारवाईत प्रभारी पोलिस निरीक्षक व त्यांच्या पथकाने तत्परतेने कार्य करून मोठा अनर्थ टळला. प्रभारी पोलिस निरीक्षक श्री चिवडशेट्टी यांच्या पोलिस पथकाच्या तत्पर कारवाईमुळे गांजाचा मोठा साठा उघड झाला आहे.

पोलिस अधीक्षक संदीपसिंह गील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार व उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. श्री सुदर्शन राठोड यांच्या नियंत्रणाखाली बारामती विभागात पोलिसांच्यावतीने पाच तालुक्यांत १६ पोलिस ठाण्यांतर्गत नाकाबंदी करण्यात आली होती. या राबविण्यात आलेल्या नाकाबंदी, रात्रगस्त, वाहन तपासणी व कागदपत्र पडताळणी मोहिमेमुळे एक मोठी कारवाई यशस्वीरीत्या उघडकीस आली.

अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार म्हणाले, या नाकाबंदी तपासणी मोहिमेत संशयित वाहनांची तपासणी करीत अनेक वाहनांवर विविध कायद्यानुसार कारवाई



करण्यात आली. शनिवारी (ता. २८) शहर पोलिसांना जळोची रस्त्यालगत एका खुल्या भूखंडात दोन ड्रम लॉक करून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी जात या १५०० लिटर क्षमतेच्या ड्रमची तपासणी केली. यावेळी ड्रममध्ये गांजासदृश पदार्थ असल्याचे दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी या ड्रममध्ये असलेल्या पाकीट उघडून तपासणी केल्यावर यामध्ये गांजा असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी याप्रकरणी दोन पंचांसमक्ष गांजा जप्त करून अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलिस तपासणीत हा ४७० किलो गांजा असल्याचे आढळून आले.

५० हजार रुपये प्रतिकिलोप्रमाणे या ४७० गांजाची किंमत २ कोटी ३५ लाख रुपये असल्याचे बिरादार यांनी सांगितले. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली आहे. परिसरातील सीसीटीव्ही तपासणी सुरू करण्यात आली आहे. हा गांजा कोठून आणला, कोणकोणत्या ठिकाणी हा पोहोचविला जात होता, याचा प्रामुख्याने शोध घेतला जाणार आहे. नागरिकांनीही संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## भरधाव टेम्पोच्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू

**तळेगाव दाभाडे, ता. १ :** भरधाव वेगातील टेम्पोने धडक दिल्याने अनोळखी पादचारी व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (ता. २५) रात्री साडेआठच्या सुमारास तळेगाव दाभाडे येथील मराठा क्रांती चौकाजवळ घडली. अब्दुल कादीर सरदार पटेल (वय -५८, रा. दुर्गा सेवासंघ प्लॉट नं. ८, झोपडपट्टी, लोटस कॉलनी, गोवंडी, मुंबई) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार कृष्णा पंढरी बावळे (वय-३१) यांनी गुरुवारी (ता. २६) तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने टाटा कँपनीचा टेम्पो (एम एच ०४ईबी ३३६४) निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून रस्ता ओलांडणाऱ्या अंदाजे ३० ते ३५ वर्षीय व्यक्तीस धडक दिली. त्यात गंभीर दुखापत होऊन संबंधिताचा मृत्यू झाला. पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहेत.

# ई–केवायसी अभावी लाडक्या बहिणींचा लाभ ठप्प; ग्रामीण भागातील पात्र महिलांमध्ये संताप

**पुणे, ता. ०१ :** राज्य शासनाच्या माझी लाडकी बहीण योजनेला सध्या ई-केवायसी प्रक्रियेचा अडथळा निर्माण झाला असून, अनेक पात्र महिलांचे हप्ते थांबले आहेत. ग्रामीण भागातील महिलांना दरमहा मिळणारा १५०० रुपयांचा आर्थिक लाभ डिसेंबर महिन्यापासून बंद झाल्याने संताप व्यक्त होत आहे.

राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना या योजनेतून दरमहा १५०० इतका लाभ थेट बँक खात्यात जमा केला जात होता. पारदर्शकता आणि नियमितता राखण्यासाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आली होती. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाने ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत दिली होती. मात्र, अनेक महिलांनी चुकीचे पर्याय




निवडले किंवा प्रक्रिया पूर्ण केली नाही. परिणामी त्यांचा लाभ थांबला आहे. राज्य शासनाच्या माझी लाडकी बहीण योजनेला सध्या ई-केवायसी प्रक्रियेचा अडथळा निर्माण झाला असून, अनेक पात्र महिलांचे हप्ते थांबले आहेत. ग्रामीण भागातील महिलांना दरमहा मिळणारा १५०० रुपयांचा आर्थिक लाभ डिसेंबर महिन्यापासून बंद झाल्याने संताप व्यक्त होत आहे.


राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना या योजनेतून दरमहा १५०० इतका लाभ थेट बँक खात्यात जमा केला जात होता. पारदर्शकता आणि नियमितता राखण्यासाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आली होती. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाने ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत दिली होती. मात्र, अनेक महिलांनी चुकीचे पर्याय निवडले किंवा प्रक्रिया पूर्ण केली नाही. परिणामी त्यांचा लाभ थांबला आहे.

अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना केवळ ई-केवायसी प्रक्रियेअभावी लाभापासून वंचित राहावे लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. शासनाला फक्त मतदानापुरतीच लाडक्या बहिणींची आठवण येते का? ई-केवायसी पूर्ण केली नाही तर आम्ही सावत्र बहिणी आहोत काय, असा संतप्त सवाल महिलांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, महिला व बालविकास विभागाने ई-केवायसीसाठी पुन्हा एकदा वेबपोर्टलवर संधी उपलब्ध करून द्यावी किंवा अंगणवाडी सेविकांमार्फत ही प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## वाघोलीत १८ वर्षांच्या तरुणीची आत्महत्या; कारण अस्पष्ट

**वाघोली, ता. १ :** भावडी रस्त्यावरील एका सोसायटीमध्ये १८ वर्षांच्या तरुणीने इमारतीच्या आठव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. ही घटना २८ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली.

मृत तरुणीचे नाव सारा लालमन अंधारे असून ती मूळची करमाळा तालुक्यातील आहे. गेल्या एक वर्षांपासून ती आपल्या आईसोबत वाघोली येथे मामाच्या घरी राहत होती. ती अकरावी इयत्तेत शिक्षण घेत होती. शनिवारी दुपारी ती लिफ्टने इमारतीच्या आठव्या मजल्यावर गेली. तेथील रिफ्युज गॅलरीमध्ये जाऊन तिने चप्पल काढली आणि खाली उडी घेतल्याची माहिती समोर आली आहे.



घटनेची माहिती मिळताच वाघोली पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत तिला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, रागाच्या भरात तिने हे पाऊल उचलले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र आत्महत्येचे नेमकेकारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. कुटुंबीय आणि ओळखीच्या व्यक्तींची चौकशी केली जात आहे. तरुण वयात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## इराणचे सुप्रीम लीडर अयातुल्ला अली खामेनेईंचा मृत्यू; देशातील विविध ठिकाणी आंदोलन

**नवी दिल्ली, ता. ०१ :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या मृत्यूच्या वृत्तानंतर हिंदुस्थानातील अनेक भागांत शोक आणि निषेधाचे वातावरण पाहायला मिळत आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त कारवाईत खामेनेई ठार झाल्याच्या दाव्यानंतर जम्मू-काश्मीरसह देशातील विविध ठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे.

श्रीनगरमध्ये काश्मीरी शिया मुस्लिम समाजाने लाल चौक येथे खामेनेई यांच्या हत्येविरोधात निदर्शने केली. कारगिलमध्येही निषेध व्यक्त करण्यात येत आहे. तसेच उत्तर प्रदेशातील लखनौ येथे शिया मुस्लिम समाजातील नागरिक रस्त्यावर उतरून संताप व्यक्त करत आहेत.

लखनौमधील शिया धार्मिक नेते मौलाना सैफ अब्बास यांनी प्रतिक्रिया



देताना सांगितले की, काल इस्त्रायल आणि अमेरिकेने केलेला हल्ला हा दहशतवादी हल्ला आहे. या घटनेमुळे संपूर्ण खाडी प्रदेश युद्धाच्या उंबरठ्यावर आला आहे. अमेरिका आणि इस्त्रायल जगभरात रक्तपात, द्वेष आणि दहशतवाद पसरवत आहेत, हे जगाने समजून घेतले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, खामेनेई हे केवळ एका देशाचे नेते नव्हते, तर प्रत्येक पीडित, प्रत्येक मुस्लिम आणि प्रत्येक मानवतेचे नेते होते. हा संघर्ष कुठे जाईल, हे कोणी सांगू शकत नाही; मात्र मला पूर्ण विश्वास आहे की इराण विजयी होईल, असेही त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, खामेनेई हे केवळ एका देशाचे नेते नव्हते, तर प्रत्येक पीडित, प्रत्येक मुस्लिम आणि प्रत्येक मानवतेचे नेते होते. हा संघर्ष कुठे जाईल, हे कोणी सांगू शकत नाही; मात्र मला पूर्ण विश्वास आहे की इराण विजयी होईल, असेही त्यांनी नमूद केले.

## ‘एसबीएल’मधील स्फोटात १७ जणांचा मृत्यू; फडणवीस यांनी दिले चौकशीचे आदेश

**नागपूर ता. १ :** जिल्ह्यातील राऊळगाव (बाजारगाव नजीक) येथील एक्सप्लोसिव्ह फॅक्टरीमध्ये झालेला स्फोट अत्यंत भीषण असून, या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे.

मुख्यमंत्र्यांनी ट्विट द्वारे माहिती दिली की, ते स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक घटनास्थळी तळ ठोकून आहेत. NDRF आणि SDRF ची पथके तातडीने मदतकार्यासाठी पोहोचली आहेत.



‘पेसो’आणि ‘डिश’या तांत्रिक तपासणी करणाऱ्या विभागांची पथकेही घटनास्थळी दाखल झाली असून स्फोटाचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू झाले आहे. या भीषण दुर्घटनेत १८ जण जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश**


राऊळगाव येथील स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद आहे. मृतांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशा भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या. तसेच, ही दुर्घटना नेमकी कशामुळे घडली आणि यात कोणाचा निष्काळजीपणा आहे का, याची सखोल चौकशी करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

# संशयास्पद व्यक्ती दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवा

### वेल्हे पोलिसांकडून नागरिकांना आवाहन

**वेल्हे, ता. १ :** तालुक्यात चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी व अनुचित प्रकार रोखण्यासाठी वेल्हे पोलीस स्टेशन तर्फे नागरिकांना महत्त्वाचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर शेवते यांनी सर्व नागरीक, व्यावसायिक व भाडेमालकांनी सतर्क राहून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व नागरिकांनी आपले घर, फ्लॅट, सदनिका किंवा रूम भाड्याने देताना संबंधित भाडेकरूसोबत विधिवत भाडेकरार करावा तसेच आधारकार्ड, पॅनकार्ड आदी कागदपत्रांच्या प्रती ठेवाव्यात. भाडेकराराची माहिती



स्थानिक पोलीस ठाण्यास कळविणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

गावांमध्ये वास्तव्यास असलेले परप्रांतीय कामगार, तसेच कंपनी, हॉटेल, दुकान, लॉज, रिसॉर्ट, बंगलो, वीटभट्टी, पोल्ट्रफार्म, राईस मिल, उसतोड आदी व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती, नातेवाईकांचे संपर्क क्रमांक आणि ओळखपत्रांच्या प्रती ठेवाव्यात. संबंधितांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासूनच त्यांना कामावर ठेवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

गावात येणारे फिरते विक्रेते, एजंट व परप्रांतीय व्यावसायिक यांची ओळख पटवून घ्यावी तसेच आवश्यक असल्यास त्यांच्या मोबाईलवर फोटो घ्यावेत. बँका, पतसंस्था, सराफ कट्टा, मंदिरे किंवा मौल्यवान वस्तू असलेल्या घरांच्या परिसरात संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

वरील सूचनांचे पालन न केल्यास भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये संबंधितांवर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला आहे.

# इस्त्रायल–इराणचे युद्ध मोदी का थांबवू शकले नाहीत?; संजय राऊत यांचा सवाल

**मुंबई, ता. १ :** इस्त्रायल-अमेरिका आणि इराणध्ये घनघोर युद्धाला सुरुवात झाली आहे. दोन्ही बाजूने क्षेपणास्त्रांचा मारा केला जात असून जगावर तिसऱ्या युद्धाचे ढग जमा होऊ लागले आहेत. रविवारी इस्त्रायल-अमेरिकेने केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी मारले गेले. त्यानंतर इराणने आखाती देशातील अमेरिकन लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. यावरून आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

रविवारी सकाळी माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, इराण-इस्त्रायल आणि अमेरिकेच्या युद्धामध्ये इराणचे सर्वेसर्वा अयातुल्ला खामेनी आणि त्यांचे कुटुंब ठार झाले. मोदी दोन दिवसांपूर्वी इस्त्रायलमधून आले. हिंदुस्थानच्या जागतिक धोरणाला बसलेला हा धक्का आहे. इराणमध्ये ४० दिवसांचा शोक जाहीर केला आहे. इराण हिंदुस्थानचा मित्र होता, इस्त्रायलही आले. इराणने संकट काळात हिंदुस्थानला अनेकदा मदत केलेली आहे. कश्मीरच्या प्रश्नावर खुलेपणाने उभा राहिलेला देश म्हणजे इराण आहे. इराण हिंदुस्थानला अत्यंत स्वस्त दरामध्ये तेल देत होता. इराणने हे मैत्रीचे नाते कायम जपले. इराणने हिंदुस्थानशी कायम मित्रत्वाचे नाते ठेवले. या युद्धा संदर्भात हिंदुस्थानने एक भूमिका घेणे आवश्यक होते. ते पुढे म्हणाले की, मोदी हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प



आणि इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांचे फार जवळचे मित्र आहेत. एकमेकांना मिठ्या मारताना काल आम्ही त्यांना पाहिले. जर हिंदुस्थान-पाकिस्तान युद्ध हे ट्रम्पने थांबवले असे ते म्हणतात, तर इराणला वाचवण्याची जबाबदारी मोदी यांची होती. ही युद्ध थांबवण्याची क्षमता मोदींमध्ये आहे असे त्यांच्या समर्थकांना वाटते.

इराणवर बॉम्ब हल्ले झाले, लहान मुलांच्या हत्या झाल्या, खामेनींचे कुटुंब त्यांच्या नातवासह मारले गेले. हिंदुस्थानचे परराष्ट्र धोरण, हिंदुस्थानचे नेतृत्व काय करत होते? हे युद्ध त्यांनाही थांबवता आले असते, असे भाजप-मोदींच्या समर्थकांचे म्हणणे आहे. जर हिंदुस्थान-पाकिस्तान युद्ध ट्रम्प थांबवू शकतात, तर इस्त्रायल-इराणचे युद्ध मोदी का थांबवू शकले नाहीत? याचे उत्तर भाजपने, सरकारने द्यावे अशी आमच्या सगळ्यांची अपेक्षा आहे, असे संजय राऊत म्हणाले.

जागतिक राजकारणासाठी आणि मध्य पूर्व आशियातील स्थैर्यासाठी अत्यंत वाईट घटना आहे. इराणचे कमजोर होणे हे हिंदुस्थानसाठीही अत्यंत घातक आहे. कारण ज्या पद्धतीने इराणवर अमेरिका आणि इस्त्रायल ताबा घेईल, हळूहळू ही पावलं हिंदुस्थानच्या दिशेने पडू शकतात. नेतन्याहू आज आहेत, उद्या नसतील. पण हिंदुस्थान हा महान देश आहे. आधीच मोदींनी अमेरिकेबरोबर केलेल्या ट्रेड डीलमुळे हिंदुस्थान हा अमेरिकेचा गुलाम झालेला आहे, असेही राऊत म्हणाले.